रजि. नं. : ई-६९, अहमद

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ८७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएस/वशी/साभनि/ ४३७ /२०२६
दिनांक :- 02 MAY 2026

प्रति,

---------------------------------

---------------------------------

---------------------------------

**विषय :-** डोअर मॅट (पायपुसणे) खरेदीसाठी दरपत्रक पाठविणेबाबत...

महोदय,

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभागातील खोल्यांचे स्नानगृहाचे दरवाजाबाहेर साईभक्तांचे सोयी-सुविधेसाठी डोअर मॅट (पायपुसणे) टाकणेकामी खालीलप्रमाणे डोअर मॅट (पायपुसणे) खरेदी करावयाचे आहेत.

| अ.नं | तपशिल | खरेदी करावयाचे नग |
|---|---|---|
| ०१ | डोअर मॅट (पायपुसणे) मॅट साईज १६ " x २४ " कॉटन विथ लॅटिक्स बेस, ॲन्टीस्लिप, वॉशेबल | १५०० नग |

**नियम व अटी** :-

१) डोअर मॅट संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे पोहोच करावे लागेल. त्यानुसार दरपत्रकात सर्व कर समावेशक (GST सह) दर नमूद करावेत. वाहतुक, हमाली व इतर खर्च वेगळा दिला जाणार नाही.

२) दरपत्रक सादर करतांना GST नंबर सादर करावे.

३) संस्थानकडून कोणत्याही स्वरुपात आगाऊ रक्कम (ॲडव्हान्स) दिली जाणार नाही.

४) कमी जास्त दराचे कोणतेही दरपत्रक स्विकारणे,नाकारणे अथवा सर्व दरपत्रके रद्द करण्या बाबतचाअधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. त्या बद्दलची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

५) मंजुर झालेल्या मान्य दराने डोअर मॅट पुरवठा करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही.

६) आपले फर्मचे लेटरहेडवर सिलबंद पाकीटात दरपत्रक बंद करुन, **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी ता.राहाता, जि.अहिल्यानगर पिन कोड-४२३१०९ या पत्त्यावर पाठविण्याचे करावे.** तसेच पाकीटाच्या वरच्या बाजुस **"श्री साईबाबा भक्तनिवासस्थान डोअर मॅट खरेदीकामी दरपत्रक"**असा स्पष्ट उल्लेख करावा.

७) दरपत्रके संस्थानचे आवक विभागात दि.०९/०५/२०२६ या अंतीम तारखेपर्यंत कार्यालयीन वेळेत म्हणजेच सायंकाळी ५.०० वा. पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

८) कार्यादेश मिळालेनंतर पुरवठाधारकाने १५ दिवसांचे आत डोअर मॅट पुरवठा करणे बंधनकारक राहील.

९) वर नमूद केलेले डोअर मॅट टिकाऊ व उच्च दर्जाचे असावेत.

१०) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी ही धर्मादाय संस्था असल्याने दरामध्ये जास्तीत जास्त सवलत दयावी.

११) वरिल डोअर मॅट खरेदीबाबत काही वाद उपस्थित झाल्यास राहाता/कोपरगांव कोर्टाच्या न्यायकक्षेत राहील.

**कळावे. श्री साईबाबांचे शुभाशिर्वादासह.**

( भिमराज दराडे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

मुंबई : साईनिकेतन, ८०४, ब. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०१४
दुरध्वनी +९१-२२-२४१६६५५६, फॅक्स : +९१-२२-२४१५०७९८, टेलिग्राम : साईनिकेतन मुंबई
website : http://www.shrisaibabasansthan.org http://www.sai.org.in
E_mail : saibaba@shrisaibabasansthan.org.in saibaba@sai.org.in